JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# स्वगताचे अंतरंग हा कवी श्रीकांत तायडे यांचा कवितासंग्रह म्हणजे स्वात्मसाधनेचा मार्गच

– डॉ. गोविंद गायकी
राजे छत्रपती कला महाविद्यालय, धामणगांव बढे, ता. मोताळा, जि. बुलडाणा

**प्रास्ताविक** : कवी श्रीकांत तायडे यांचा स्वगताचे अंतरंग हा 57 कवितांचा कविता संग्रह प्रकाशित होत असून समकालीन मराठी कवितेत मैलाचा दगड ठरल्याशिवाय राहणार नाही, याची मला खात्री आहे. केशवसूत यांनी म्हटल्याप्रमाणे कविता लिहिणे म्हणजे आकाशातील विजेला हातात पकडणे. त्या शंभरपैकी 99 टक्के लोक जळून भस्म होतात. 10 टक्के लोक कवितेला आत्मसात करुन उभे राहातत. श्रीकांत यांच्या कविता वाचून ते त्या 1 टक्क्यात आहेत असे मला वाटते व त्यांची कविता वरवर साधी सोपी वाटप असली तरी एखाद्या शेतातील तयार केलेल्या वाफ्यात पाणी जसं हळूहळू मुरत जाऊन बारं चिंब भिजवते. त्याप्रमाणे श्रीकांतची कविता वाचतांना रसिकांचे मन चिंब भिजवून टाकते. तद्वतच मेंदू मात्र सुन्न करून टाकते. कवीने कवितासंग्रहाचे दोन भाग केले असून अंतःस्थ आणि बहिस्थः यावरून कवीचे प्रखर आत्मभान दिसून येते. त्यांची कविता मानवी जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करते. मानवी जीवनातील आदिबंध त्यांच्या कवितेत दिसून येतात. दुभंगलेल्या मनाचे चित्रण करतांना ते म्हणतात– मी

जणू एक नाने
कथलाचा शिक्का वा प्रचितावे खरे कलदार पक्का
हा ही मी नि तो ही मी
नि तो ही मी
जरी एक शाहिरी परी भिन्न मी अंतरी

या कवितेत मानवी मनाचे दुभंगलेपणाचे दर्शन घडवते. जाणिव आणि नेणिवेच्या पातळीवर मानवी मनाचा शोध घेते. डॉ. युंग म्हणतात, नेणिवेचे क्षेत्र हे सागरासारखे आहे. तर जाणिवेचे क्षेत्र हे एखाद्या बेटासारखे आहे. त्यापैकी नेणिवेचे क्षेत्र दोन स्तरावर विभागले आहे. चेतन मन दुसरे आहे. सामुहिक अचेतन मन यांचे दर्शन कवितेतील प्रतिमा प्रतिकांच्या माध्यमातून येते, अशी कवितेची ही एखादा हेतू डोळ्यासमोर ठेवून निर्माण होत नाही, ती उत्स्फुर्त असते. त्यांची निर्मिती ही जगण्याच्या प्रेरणेतूनच होते. म्हणून ही कविता समकालीन कवितेत आपले वेगळे स्थान निर्माण करते. त्यांच्या कवितेत पित्याचा आदिबंध दिसतो. बाप होत महावृक्ष

माय त्याची होती मूळ आम्हा लेकरा पाखरा
तेच सर्वस्व गोकूळ

मराठी कवितेत केशवसुतांनी निसर्गाला महत्त्वाचे स्थान दिले. बालकवीने नितळ झऱ्यासारखी निसर्गकविता खळखळत ठेवली तर ना.धों.महानोरांनी निसर्गाला देहरूपच दिले. कवी श्रीकांत तायडे यांची निसर्ग कविता ही बालकवीच्या कवितेशी नाते सांगणारी आहे. तिला कुठेही वासनेचा गंध नाही. ते आपल्या कवितेत म्हणतात— प्रभा उमलली सृष्टी हसली नवतेजाने उभा नटला

चरा—चरा चौतन्य थिरकुनी
किलबिल किलबिल पहाट झाली

या कवितेत निसर्गाचे निखळ वर्णन असून मेळघाटातील सौंदर्याच्या संवेदना
त्यांच्या कवितेत दिसून येतात. ते म्हणतात—

बरहते वनराई संगे आदिमाचा थाट
येथे निरागस जीवन वसत मेळघाट

कवी आपल्या निसर्गविषयक कवितेतून निसर्गचित्र डोळ्यासमोर उभे करीत असतात. त्या परिसरातील आदिवासी हा निसर्गाशी एकरूप होऊन जगतो. निसर्ग जसा बदलतो तसा आदिवासी बदलत जातो. म्हणून जवीनाचा चौतन्यमय आनंद घेतो. कवीने प्रेमकविता लिहितांना प्रेमानुभवाला निसर्गाशी सांगड घालून निर्व्याज प्रेम, त्यात सात्विकता, कुठंही वासनेचा गंध दिसत नसून निखळ प्रेमभावनेचे दर्शन कवितेतून होते. त्यांची प्रेमकविता ही ना.धोंमहानोरांच्या कवितेप्रमाणेच निसर्गाला देहरूप देते. ते आपल्या कवितेत
म्हणतात— नाता तुझे माझे गार वारा पहाटेचा

रंगे सपन उरालं गोड साखर झोपेची नाते तुझे माझें ऋतू दिखा श्रावण
नाते तुझे माझे पिक लव—लवणारे
धरी आशेचे कणिस त्यासी प्रति खतपाणी किंवा
धवल दुग्ध मंत्रमुग्ध गंध गावरा वेणीत गुंफियला शितल मोगरा चाफा
असा गंधीत दरवळ
मनी जसा वसंत हिरवळ

कवीने चाफा, मोगरा या निसर्गातील प्रतिमा प्रतिकांना देहरूप देवून निसर्गाशी एकरूप होऊन प्रेमभाव कवितेतून व्यक्त होतो. काही कविंच्या कवितेची नाळही संत ज्ञानेश्वरांच्या कुळाशी नातं सांगते. ते त्या उपजत मिळालेले असते, तर काही कवींच्या कविताचे मूळ हे तुकारामाच्या कवितेशी जुळतात, तसे जसे अनुभव जीवनात संत तुकारामांना आले तशी तशी तुकारामांची अभंगवाणी बहरत गेली. कवी श्रीकांत तायडे यांची कविताही संत तुकारामाच्या कवितेशी नातं सांगणारी आहे. संत तुकाराम महाराज ज्याप्रमाणे स्वतःशी अभंगातून संवाद साधतात. त्याचप्रमाणे कवी श्रीकात तायडे स्वतःच्या मनाशी संवाद साधताना दिसतात. संवादाची ही जाणीव

जगण्याची अपरिहार्य नेणिव
शुद्र नव्हे नुसता बोलीचा
श्वास असे तो जगण्याचा किंवा
आजही शोधू न शकालो स्वतःशी
वणवण फिरलो रानोमाळ
दरी कपारी डोंगर जाल दृथाल पालथे घालू हे आभाळ

स्वतःतील स्व चा शोध घेण्याचे काम कवी आपल्या कवितेतून करतो. या कवितांचे वैशिष्ट्य म्हणजे रचनाबंध शैली आणि काही कवितेतील अल्पाक्षराच यांची योग्य सांगड घातली. मराठी कवितेत आपले वेगळे स्थान निर्माण करेल, याची खात्री आहे.

—000—